प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
Regd. Office: Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
Head Office: CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;
For updated information, follow us on - @cidco_ltd /cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दि. २४.०५.२०२२**

**सिडकोतर्फे कांदळवन क्षेत्र हस्तांतरणाची प्रक्रिया पूर्ण**

**९०८ हेक्टर कांदळवन क्षेत्राचे वन विभागास करण्यात आले हस्तांतरण**

सिडकोतर्फे दि. २४/०५/२०२२ रोजी एकूण सुमारे ९०८ हेक्टर कांदनवळाखालील जमीनीच्या हस्तांतरणाबाबतची प्रक्रिया पूर्ण करण्यात आलेली आहे. यापैकी २७९ हेक्टर जमीन सिडकोच्या ताब्यात असून सिडको क्षेत्रातील उर्वरित ६२९ सिडकोच्या ताब्यात नसलेल्या जमीनीकरिता ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. श्री. आदित्य ठाकरे, मा. पर्यावरण मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडून दि. १८/०४/२०२२ रोजी झालेल्या बैठकीत सिडकोस कांदळवनाखालील जमीन वन विभागास हस्तांतरित करणेबाबत निर्देश देण्यात आलेले होते.

या प्रसंगी डॉ. संजय मुखर्जी, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. विरेंद्र तिवारी, अति. प्रधान मुख्य वनसंरक्षक, कांदळवन कक्ष, महाराष्ट्र, डॉ. कैलास शिंदे, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, श्री. रवी कुमार, मुख्य नियोजनकार, सिडको आणि श्री. आदर्श रेड्डी, उपवनसंरक्षक, कांदळवन कक्ष हे प्रामुख्याने उपस्थित होते.

पर्यावरण संरक्षण व  संवर्धन उपक्रम आणि शाश्वत विकासासाठी सिडकोने नेहमीच सहकार्य केले आहे. याचाच एक भाग म्हणून मा. श्री. एकनाथ शिंदे, नगर विकास मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या मार्गदर्शनाखाली व उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार सदर कांदळवन क्षेत्राचे वन विभागास हस्तातंरण करण्यात आले आहे.

सिडको महामंडळाच्या ताब्यात असलेली ठाणे तालुक्यातील सुमारे १४५८ हेक्टर कांदळवनाखालील क्षेत्र यापूर्वीच वनविभागाकडे हस्तांतरीत करण्यात आलेले आहे. मा. पर्यावरण मंत्र्यांनी दिलेल्या निर्देशांनुसार, एकूण सुमारे ९०८ हेक्टर कांदनवळाखालील जमीनीचे हस्तांतरणाबाबतची प्रक्रीया सिडकोतर्फे पूर्ण करण्यात आली आहे. यापैकी २७९ हेक्टर जमीन सिडकोच्या ताब्यात असून उर्वरित सिडकोच्या ताब्यात नसलेल्या जमीनीकरिता ना-हरकत प्रमाणपत्र प्रदान करण्यात आले आहे. आतापर्यंत सिडकोने पनवेल आणि उरण

तालुक्यांतील कांदळवनाखालील १२५८ हेक्टर जमिनीचे हस्तातंरण पूर्ण केले असून नवी मुंबईतील संपूर्ण कांदळवन क्षेत्राचे हस्तातंरण करण्याची प्रक्रिया सिडकोने पूर्ण केली आहे.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

जनसंपर्क विभाग, सिडको